# वादपत्र दुरुस्ती अर्ज निशाणी क्र.१७ खालील आदेश

**(पारीत दिनांक ०७/०८/२०२५)**

**CNR No. MHLA140031882021**

प्रस्तूतचा अर्ज वादीने ***दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चा क्रम ०६ नियम १७*** अनुसार वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे.

**०२.** वादीने असे कथन केले आहे की, सदर दावा वादीने वाटणी होऊन स्वतंत्र ताबा मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. वादीने दावा दाखल करताना अनावधानाने व नजर चुकीने वाद मिळकतीबद्दल सविस्तर माहिती दाव्यात नमुद केली नाही. तसेच, वादीने त्याच्या एकत्रीत कुटुंबातील घराच्या मिळकतीस ही दावा दाखल करताना कागदपत्र उपलब्ध नसल्याने दाव्यात सामाविष्ठ केलेले नाही. सदर दावा वाटणी करीता असल्याने दाव्यात वाद मिळकती बद्दल सविस्तर माहिती व वर्णन तसेच समाविष्ठ न केलेल्या घराच्या मिळकतीस दाव्यात समाविष्ठ करणे अत्यंत गरजेचे आहे. सबब प्रस्तावित दुरुस्ती अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली आहे.

**०३.** प्रतिवादींनी पुरेपुर संधी देवूनही सदर अर्जास त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. सबब अर्ज त्यांचे 'म्हणणे शिवाय' चालविण्यात आला.

**०४.** अभिलेखाचे अवलोकन केले. वादीतर्फे युक्तिवाद ऐकला.

**०५.** वादीने सदरचा दावा वाटणी होऊन स्वतंत्र ताबा मिळणेकामी दाखल केला आहे. वादीने अर्जातील परिच्छेद क्र.२ ते परिच्छेद क्र.५ मध्ये नमुद प्रस्तावित दुरुस्तीप्रमाणे वादपत्रामध्ये दुरुस्ती करणे गरजेचे असल्याने तशी दुरुस्ती करणेसाठी मागणी केलेली आहे. सदर दुरुस्ती ही किरकोळ स्वरुपाची असून त्यामुळे दाव्याचे स्वरुप बदलणार नाही. म्हणून अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब खालीलप्रमाणे आदेशः–

# आदेश

१. वादीचा अर्ज **नि.क्र.१७** मंजूर करण्यात येतो.

२. वादीने वादपत्रात अर्जात नमुद केल्याप्रमाणे प्रस्तावीत दुरुस्ती पुढील तारखेला किंवा त्या अगोदर करुन वादपत्राची एकत्रीत प्रत व हुकूमनाम्यासाठी वादपत्राची दुय्यम प्रत दाखल करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed by SABALE SHITAL DATTATRAY
Date: 2025.08.07 17:22:05 +0530

**(श्रीमती एस. डी. साबळे)**

दिनांकः– ०७/०८/२०२५. २रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, औसा.

ठिकाण – औसा. जिल्हा लातूर.